


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : २१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०४ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मराठवाड्यातून २११ कंपन्या बाहेर, समृद्धीवर दरोडे ; आदित्य ठाकरे यांचा सरकारवर निशाणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, छत्रपती संभाजीनगर :** राजकारणापलीकडे जाऊन आता विकासाचा विचार करण्याची वेळ आली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात आम्ही जी कामे सुरू केली होती, त्याचे क्रेडिट हवे तर भाजपला घेऊ द्या; पण मराठवाड्याची अडकलेली विकासकामे पूर्ण करा, असा रोखठोक सल्ला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी दिला. छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर असताना पत्रकार परिषदेत त्यांनी मराठवाड्यातील उद्योग, बेरोजगारी, जीडीपी आणि आरक्षणाच्या मुद्द्यांवरून राज्य सरकारवर टीकास्त्र सोडले.

मराठवाड्यातील औद्योगिक स्थितीवर भाष्य करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, गेल्या काही काळात मराठवाड्यातून तब्बल २११ कंपन्या एकतर बंद पडल्या आहेत किंवा राज्याबाहेर गेल्या आहेत. म ोठी निवडणूक नसतानाही सरकारचे लक्ष विकासाकडे नसून केवळ राजकारणाकडे आहे, असा आरोप त्यांनी केला. राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर बोट ठेवत ते म्हणाले की, एकीकडे वार रूममध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आपापसात वाद सुरू आहेत, तर दुसरीकडे समृद्धी म हामार्गावर दरोडे पडत आहेत. अशा परिस्थितीत राज्यातील जनतेला सुरक्षेची हमी कोण देणार?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.




**आदित्य ठाकरे मराठा आरक्षणावर काय म्हणाले?**

मराठा आरक्षण आणि सामाजिक असंतोषाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, कोणाच्याही हक्काचे न काढता, ज्यांच्या अधिकाराचे आहे त्यांना आरक्षण दिलेच पाहिजे. आज राज्यातील सगळे समाज रस्त्यावर उतरले आहेत, कारण सरकारकडून केवळ खोट्या आश्वासनांची खैरात केली जात आहे. सरकार म्हणून कोणीही पुढे येऊन ठोस भूमिका घेत नसल्याचे चित्र आहे, असे ते म्हणाले.

**जीडीपीच्या मुद्द्यावर टीका**

देशाच्या आणि राज्याच्या आर्थिक स्थितीवर बोलताना त्यांनी जीडीपीच्या आकडेवारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जीडीपी ७.८ टक्के सांगतायत, पण तो प्रत्यक्ष दिसलाही पाहिजे. एकीकडे जीडीपी वाढीचा दावा केला जातो आणि दुसरीकडे पंतप्रधान सोने खरेदी करू नका, परदेशात जाऊ नका असे सांगत आहेत, यात मोठी विसंगती आहे. महाराष्ट्राच्या उद्योगांच्या स्थितीवर सरकारने श्वेतपत्रिका जाहीर करावी, अन्यथा ती केवळ कोऱ्या कागदावरच येईल, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

**आदित्य ठाकरे आणखी काय म्हणाले?**

तरुणांच्या ताकदीचा उल्लेख करताना ते म्हणाले की, जंतर-मंतरच्या आंदोलनानंतर देशातील Gen-Z तरुणाईमध्ये मोठी ताकद निर्माण झाली असून सर्व तरुण रस्त्यावर उतरत आहेत. आमचे सरकार असताना आम्ही पूर्ण निधी दिला. मी रात्रीच्या वेळीही संभाजीनगरमध्ये फिरून महापालिकेच्या कामांचा आढावा घ्यायचो. मी आज निसर्ग आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोललो तर मला 'अर्बन नक्षल' म्हटले गेले. पण मला क्रेडिटची गरज नाही, केवळ मराठवाड्याची कामे झाली पाहिजेत, असे शेवटी आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केले. हवामान बदलामुळे मराठवाड्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर नदीजोड प्रकल्प आणि संशोधनाची गरज असताना मंत्री मात्र भलत्याच विषयांवर चर्चा करत असल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

---

# ओडिशातून चंद्रपुरात गांजा तस्करी !

## एलसीबीचा तस्करांवर 'सर्जिकल स्ट्राईक', १७.४७५ किलो गांजासह तिघांना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, बल्लारपूर (चंद्रपूर) :** ओडिशातून चारचाकी वाहनाने गांजाची तस्करी करून विक्रीसाठी आणणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) सापळा रचून अटक केली. ही कारवाई २ सप्टेंबर २०२६ रोजी बल्लारपूर-राजुरा म ार्गावरील बामणी चौकात करण्यात आली. या कारवाईत १७.४७५ किलो गांजा, चार मोबाईल आणि चारचाकी वाहन असा एकूण १७ लाख ८ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, काही इसम ओडिशातून गांजा घेऊन चारचाकी वाहनाने येत असून, तो विक्रीसाठी घेऊन जाणार आहेत. या माहितीची खात्री करून एलसीबी पथकाने बल्लारपूर-राजुरा मार्गावरील बामणी चौकात



सापळा रचला.

संशयित चारचाकी वाहन क्रमांक एचएच-२४-बीआर-९२८२ तेथे येताच पोलिसांनी वाहनाची तपासणी केली. यावेळी वाहनामध्ये गांजा सदृश्य वनस्पती एकूण १७.४७५ किलो आढळून आली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अमोल रमेश कांबळे (वय ३३, रा.एरंडी सरोडा,ता. औसा,जि.लातूर), सदानंद रविंद्र जना (वय ३२, रा.साबोरीया,ता.खलीगोट,जि. गंनजम, ओडिशा )आणि ओंगा बिरा कोवासी (वय २८, रा.बोपनपल्ली,ता. कालीमेला,जि. मलकनगिरी, ओडिशा) यांना ताब्यात घेतले.

आरोपींकडून १७.४७५ किलो गांजा, चार मोबाईल आणि चारचाकी वाहन असा एकूण १७,०८,७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरुद्ध गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ (एनडीपीएस ॲक्ट )अंतर्गत बल्लारशा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघांनाही अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बल्लारशा पोलीस ठाणे करीत आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी आणि अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत सपोनि.दिपक कांकेडवार, सपोनि.बलराम झाडोकार, पोउपनि. सर्वेश बेलसरे, सफौ. स्वामीदास चालेकर, पोहवा.अजय बागेसर, गणेश भोयर, रामराव बिंगेवाड, शरद कुडे, रजनीकांत पुठ्ठावार, सचिन गुरनुले, सुभाष गोहोकार, पोअं.प्रतिक हेमके, विठ्ठल काकडे, प्रफुल पुप्पलवार आणि पोशि. दिनेश अराडे यांनी सहभाग घेतला.

---

# करंजी गावाला अज्ञात तापाची लागण

## आरोग्यव्यवस्थेच्या दुरवस्थेने ग्रामस्थ त्रस्त

**अक्षराज : संतोष बांदूरकर**



**दि.०३, गोंडपिपरी :** गोंडपिपरी तालुक्यातील सुमारे पाच हजार लोकसंख्या असलेल्या करंजी गावात गेल्या काही दिवसांपासून अज्ञात तापाची साथ पसरल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील अनेक कुटुंबांतील किमान एक व्यक्ती तापाने आजारी असल्याचे चित्र असून, अर्ध्याहून अधिक गाव तापाने फणफणत असल्याचा दावा ग्रामस्थांकडून केला जात आहे. मात्र, एवढी गंभीर परिस्थिती असतानाही आरोग्य विभागाचे याकडे अद्याप पुरेसे लक्ष गेले नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. करंजी हे परिसरातील मोठे गाव असून त्यासोबत दोन गावे जोडलेली आहेत. गावातील नागरिकांच्या आरोग्याची काळजीघेण्यासाठी आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित आहे. तसेच अवघ्या सात किलोमीटर अंतरावर ग्रामीण रुग्णालयाची सुविधाहीउपलब्ध आहे.

मात्र, प्रत्यक्षात या आरोग्य सुविधांचा ग्रामस्थांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. आरोग्य उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर प्रश्नचिन्हग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, आरोग्य उपकेंद्रातील डॉक्टर पूर्णवेळ उपलब्ध राहत नाहीत. नियमित आरोग्य सेवक वसेविकाही अनेकदा उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी आहेत. डॉक्टर दिवसा येऊन सायंकाळी निघून जात असल्याने रात्रीच्या वेळी अचानक आजारी पडलेल्या रुग्णांना उपचारासाठी इतरत्र धाव घ्यावी लागत आहे. काही ग्रामस्थांना रात्री रुग्णालयात जाऊनही अपेक्षित उपचार न मिळाल्याने माघारी फिरावे लागत असल्याचे सांगण्यात येते. आरोग्य विभागाची सेवा जनतेसाठी महत्त्वाची आणि सातत्यपूर्ण असताना कर्मचाऱ्यांच्या कथित अनुपस्थितीमुळे गावातील आरोग्यव्यवस्था कोलमडल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. विशेषतः सध्या अज्ञात तापाचे रुग्ण वाढत असताना आरोग्य यंत्रणेने तातडीने गावात पाहणी करून आजाराचे नेमके कारण शोधणे गरजेचे आहे. वेळीच उपाययोजना करण्याची मागणी करंजी गावातील सद्यस्थितीची तातडीने दखल घेऊन आरोग्य विभागाने वैद्यकीय पथक पाठवावे, नागरिकांची आरोग्य तपासणी करावी तसेच तापाच्या रुग्णांचे नमुने घेऊन आजाराचे कारण स्पष्ट करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना न झाल्यास सध्या गावापुरती मर्यादित असलेली परिस्थिती आसपासच्या परिसरातही

पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने केवळ कागदोपत्री उपाययोजना न करता प्रत्यक्ष गावात उतरून परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

---

# मुंबई - पुणे दरम्यान सुपरफास्ट बुलेट ट्रेन सुरु करणार - केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव

## फक्त ४८ मिनिटात पुण्यात आणि सव्वा ३ तासात हैद्राबादला जाता येणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, मुंबई :** कोकणवासीयांच्या 'सीएसएमटी-सावंतवाडी रोड' या नियमित रेल्वेगाडीच्या शुभारंभी गुरुवारी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उपस्थितांशी दुरदृश्यप्रणालीने संवाद साधला. लवकरच मुंबई -पुणे दरम्यान सुपरफास्ट बुलेट ट्रेन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. या ट्रेनमुळे दिवसातून दोनदा मुंबईला वडापाव आणि पुण्याला बाकरवडी खाण्यासाठी जाता येईल, असा कॉरिडोअर आम्ही तयार करत आहोत, असेही अश्विनी वैष्णव म्हणाले. तसेच मुंबई ते हैद्राबाद दरम्यान सव्वातीन तासात प्रवास करणे शक्य होणार आहे. सोबत प्रस्तावित सुरत-दानकुनी पूर्व-पश्चिम रेल्वे कॉरिडॉरमुळे महाराष्ट्रातील रेल्वे सुविधा नसलेल्या अनेक भागांना कनेक्टिव्हिटी मिळून औद्योगिक आणि ग्रामीण विकासाला चालना मिळेल, असे ही वैष्णव यांनी यावेळी जाहीर केले.



मुंबईकरांशी संवाद साधताना अश्विनी वैष्णव यांनी ही खूश खबर दिली. मुंबईसह परिसरात रेल्वेची १८ हजार कोटींची कामे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बुलेट ट्रेनचे काम रोखले होते, असा सणसणीत आरोप त्यांनी यावेळी केला.

परंतु, ठाकरे मुख्यमंत्री पदावरून गेल्यानंतर बुलेट ट्रेनचे काम वेगाने सुरू झाले. या कामामुळे दिवसातून दोनदा मुंबईत वडापाव आणि पुण्यात जाऊन बाकरवाडी खाता येईल, असा कॉरिडॉर आम्ही बनवत असल्याचा दावा त्यानी केला. पुढे पुणे ते हैद्राबाद नवीन कॉरिडॉर

२ तास १५ मिनिटाचा असणार आहे. त्यामुळे मुंबई ते हैद्राबाद दरम्यान सव्वातीन तासात प्रवास होईल, असेही वैष्णव यांनी स्पष्ट केले. गेल्या निवडणुकीत आम्ही गणपतीत ३०० पेक्षा जास्त स्पेशल ट्रेन सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. यंदा आम्ही ३५० स्पेशल ट्रेन सुरू करत आहोत. गरज भासल्यास आखणी २०

स्पेशल ट्रेन सुरू करणार आहोत, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी येथे दिली.

मुंबईसाठी नव्या २३९ एसी लोकल तयार करण्याचे आदेश रेल्वे बोर्डाने दिले आहेत. २०२७ मध्ये यातील पहिली एसी लोकल येईल. त्यानंतर २०३०पर्यंत सर्व एसी लोकल मुंबईत धावतील, असेही ते म्हणाले. मुंबईतील सिग्नल यंत्रणा अद्यावत करण्याचे काम सुरू आहे. सध्या ३२०० लोकलच्या फेऱ्या होतात. त्या ३५०० पर्यंत नेणार आहोत. १५ डब्यांच्या लोकलही वाढवत आहोत. त्यामुळे

मुंबईकरांचा प्रवास सुखकर आणि लोकलमधील गर्दी कमी होईल असा विश्वास वैष्णव यांनी यावेळी व्यक्त केला.

---

# तुर्भे विभागात अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** सानपाडा सेक्टर १ येथील तळमजल्यावरील स्कूटर पार्किंगच्या जागेत विनापरवानगी बांधकाम करून सुरू असलेला वाणिज्य वापर नवी मुंबई महानगरपालिकेने कारवाई करून हटविला. तुर्भे विभागांतर्गत मे. शिवशंकर बिल्डर्स आणि डेव्हलपर्सच्या शॉप क्रमांक ६, ७, ८ आणि ९ येथे ही कारवाई करण्यात आली.

महापालिकेच्या स्थळपाहणीत शॉप क्रमांक ६ मध्ये ३.६५ मीटर ̧ २.०० मीटर, तर शॉप क्रम ांक ७ आणि ८ मध्ये प्रत्येकी ३.५० मीटर ̧ २.०० मीटर आणि शॉप क्रमांक ९ मध्ये ३.६५ मीटर ̧ २.०० मीटर क्षेत्रफळात पार्किंगच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करून त्याचा वाणिज्य वापर सुरू असल्याचे आढळून आले. संबंधित बांधकामाला महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही वाणिज्य वापर सुरूच असल्याने महापालिकेने तोडक कारवाई केली. आयुक्तांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त राहुल गेठे आणि उप आयुक्त (अतिक्रमण) संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच सहाय्यक आयुक्त, तुर्भे सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली. कनिष्ठ अभियंता विनोद आंब्रे यांच्यासह विभागातील अधिकारी व कर्मचारी कारवाईवेळी उपस्थित होते. अतिक्रमण निर्मूलन पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच सुरक्षारक्षकही तैनात करण्यात आले होते.

अनधिकृत बांधकाम हटविण्यासाठी एक जेसीबी, दोन इलेक्ट्रिकल हॅमर, एक गॅस कटर आणि २४ मजुरांची मदत घेण्यात आली. भविष्यातही अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामांविरोधातील कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले.




## मातृभाषा बदलणारी मराठी मुले

महाराष्ट्रात रिक्षा चालवायची असेल तर मराठी आलेच पाहिजे. आम्ही प्रशिक्षण देतो. तुमचे वर्ग घेतो. तुम्हाला पाहिजे ती मदत करतो, पण तुम्ही मराठी शिकाच! कारण, मराठी ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. ही परिवहन विभागाची भूमिका. राज्यभर गाजली. मराठी भाषकांनी त्याचे समर्थन केले. हिंदीभाषकांनी विरोध केला. मुंबईत वादविवाद, मारामारीपर्यंत गोष्टी गेल्या. दुसरीकडे, उपराजधानीत म्हणजे नागपुरात भलतीच गोष्ट समोर आली. इथे मराठी मुलांनी आपल्याला चांगल्या इंजिनीअरिंग कॉलेजात प्रवेश मिळावा म्हणून आपली मातृभाषाच बदलविण्याचा पराक्रम केला.

मराठी मातृभाषक मुलांनी 'आम्ही हिंदी मातृभाषक आहोत,' असे कायदेशीर कागदोपत्रांवर दर्शविले. असे एकट्या-दुकट्या मुलाने केले असते तर, अपवाद म्हणून सोडूनही देता आले असते. प्रत्यक्षात तीनशेहून अधिक मुलांनी मातृभाषेपासून फारकत घेतली. हा सगळा प्रकार या वर्षी उघडकीस आला म्हणून ते समजले तरी. गेल्या कित्येक वर्षांपासून हा प्रकार सुरू असेल आणि किती तरी कागदपत्रांवरून मराठी मातृभाषा हद्दपार होऊन हिंदीचा झेंडा उंचावला गेला असेल.

नागपुरात अनेक इंजिनीअरिंग कॉलेजे आहेत. त्यातील नावाजलेल्या कॉलेजांत प्रवेश मिळावा म्हणून मुलांची धडपड असते. अशा कॉलेजांतील प्रमुख कॉलेजे ही हिंदी अल्पसंख्याक संस्थेची आहेत. मातृभाषा हिंदी असलेल्यांसाठी तेथे ५० टक्के आरक्षण असते. उर्वरित सगळ्या विद्यार्थ्यांना उरलेल्या ५० टक्के जागांमधून प्रवेश घ्यावा लागतो. त्यांच्यात तीव्र स्पर्धा होते. ९५ ते ९९ टक्के गुणांचा कटऑफ असतो. हिंदीभाषकांसाठी आरक्षित ५० टक्के जागांमध्ये तेवढी तीव्र स्पर्धा नसते. त्यांना ८० ते ९० टक्के गुणांच्या जोरावर चांगल्या शाखांमध्ये प्रवेश मिळतो. ही बाब प्रवेश घडवून आणणाऱ्या काही संस्थांनी नेमकी हेरली. मुलांच्या 'टीसी'वर मातृभाषेच्या कॉलममध्ये 'हिंदी' असे नमूद करायचे आणि अल्पसंख्याक संस्थांत प्रवेश मिळवून द्यायचा, असा उद्योग त्यांनी सुरू केला.

हे प्रकार आठ-दहा प्रवेशांपुरते मर्यादित होते, तोवर कुणाच्या लक्षात आले नाही. हळूहळू त्यांचे प्रमाण वाढू लागले. या वर्षी तशा प्रकारचे ३२० प्रवेश झाले. ज्या आडनावावरून ही मंडळी मराठी आहेत, हे ओळखू यावे, अशा आडनावाच्या मुलांच्या 'टीसी'वर हिंदी मातृभाषा बघून प्रवेश यंत्रणा दचकली. मग चौकशीत अनेक सुरस कथा समोर आल्या. एकाच विद्यार्थ्याच्या दोन 'टीसी' समोर आल्या. त्यातील एकात मातृभाषा मराठी, तर दुसरीवर हिंदी होती. कुणी बारावीची टीसी शाळेतून घेताना, त्यावर भाषेचा रकाना मुद्दाम रिक्त ठेवला होता. त्यांनी नंतर प्रतिज्ञापत्राद्वारे मातृभाषा हिंदी असल्याचे सांगितले. कुणाची दहावीची आणि बारावीची वेगळी होती. कुणीकुणी प्राचार्यांची खोटी स्वाक्षरी केली होती. विद्यार्थ्यांना नोटिसा गेल्या. मध्यस्थांनी पैसे घेऊन, आम्हास न कळविता परस्पर हा प्रकार केला, असे काही पाल्यांनी सांगितले. पैशांचा व्यवहार झाला म्हणून या सगळ्या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला. तो सुरू आहे. मुले अस्वस्थ आहेत, पालक त्याहून चिंताग्रस्त आहेत. विद्यार्थी संघटना विद्यार्थ्यांच्या बाजूने मैदानात उतरलेल्या आहेत. त्या आंदोलन करीत आहेत. या सगळ्या प्रकाराचा शेवट कसा होणार, कोण जाणे!

मराठी आणि हिंदी हा वाद अलीकडचा नाही. तो अनेक दिवसांपासूनचा धुमसता आहे. हिंदी आणि मराठी वादाची पहिली ठिणगी ही नागपुरात पडली होती. सी. पी. अँड बेरार म्हणजेच तत्कालीन मध्य प्रांतातून मराठी बोलणारा भाग वेगळा करावा, असा ठराव १९३८ साली बॅरिस्टर रामराव देशमुख यांनी विधिमंडळात मांडला होता. त्यांच्याच पुढाकारात मराठीभाषक संयुक्त महाराष्ट्रासाठी बैठक झाली होती. नागपूरचे ज्येष्ठ संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांनी साहित्य संमेलनात मराठी महाराष्ट्राचा मुद्दा ऐरणीवर आणला होता. ज्या प्रदेशातून मराठीसाठीचे एवढे प्रयत्न झाले, तिथे मराठीवर अशी वेळ का यावी, हा प्रश्न निश्चितच विचार करायला लावणार आहे. कुणी सहजासहजी आपली मातृभाषा बदलत नसतो. जेव्हा नियम पालन करण्यास अडचणीचे वाटतात तेव्हा ते तोडण्याचा प्रयत्न केला जातो. काही नियम मराठी भाषकांना चांगल्या कॉलेजची पायरी चढू देत नसतील, त्यांना इतरत्र संधी मिळत नसेल अशा वेळी मराठी मुलांना सहज प्रवेश मिळू शकेल अशी व्यवस्था करता येईल का? मराठीवरचे प्रेम व्यक्त करताना, तिचा वापर वाढविण्याचा आग्रह धरताना या गोष्टीचाही विचार व्हावा. तशी यंत्रणा उभी व्हावी.

– अतुल पांडे

# परीक्षा पेपरफुटी... झालीया डोकेदुखी!

परीक्षार्थींच्या भवितव्याचा बाजार मांडला जातोय?

परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका, दोन-तीन तासांचे उत्तरलेखन आणि निकाल नव्हे. त्या परीक्षेमागे असतात विद्यार्थ्यांची वर्षानुवर्षांची मेहनत, आई-वडिलांची स्वप्ने, कुटुंबाने केलेला आर्थिक त्याग आणि उज्ज्वल भवितव्याची आशा.

पण आज याच आशेवर घाला घातला जात आहे.

कधी नीट कधी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपरफुटीच्या वादात सापडते, तर आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. एकीकडे विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करून स्पर्धेत उतरतो आणि दुसरीकडे काहीजण प्रश्नपत्रिका आधीच मिळवून त्याच स्पर्धेचा बाजार मांडतात.

हा केवळ पेपरफुटीचा प्रकार नाही; हा प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्या लाखो तरुणांच्या स्वप्नांवरचा घाला आहे!

मेहनत करणारा हरतोय आणि 'पेपर मिळवणारा' जिंकतोय? एक विद्यार्थी दोन-दोन, तीन-तीन वर्षे स्पर्धा परीक्षेची तयारी करतो.

मोबाईलपासून दूर राहतो.

मित्रांचे कार्यक्रम टाळतो.

क्लासेस आणि पुस्तकांवर पैसा खर्च करतो.

अपयश आले तरी पुन्हा उभा राहतो.

आणि परीक्षा केंद्रावर गेल्यानंतर जर त्याला कळले की कुणीतरी प्रश्नपत्रिका आधीच मिळवून बसले होते, तर त्याच्या मनात काय वादळ उठत असेल?

त्याच्या गेलेल्या वर्षाचे काय?

त्याच्या वाया गेलेल्या पैशाचे काय?

त्याच्या मानसिक त्रासाचे काय?

आणि सर्वांत गंभीर प्रश्न

प्रामाणिकपणे अभ्यास करूनही फायदा काय?

हा प्रश्न जर तरुणांच्या मनात निर्माण झाला, तर त्यापेक्षा मोठे अपयश परीक्षा व्यवस्थेचे दुसरे कोणते असू शकते?

परीक्षा पुढे ढकलणे हा कायमस्वरूपी उपाय नाही!

पेपर फुटला की परीक्षा पुढे ढकलली जाते.

चौकशी समित्या नेमल्या जातात. SIT स्थापन होते. काही आरोपींना अटक होते.

काही दिवस माध्यमांमध्ये चर्चा होते.







आणि नंतर पुन्हा सगळे शांत!

पण विद्यार्थ्यांचे काय?

त्यांचे एक वर्ष कोण परत देणार?

त्यांचे वय कोण परत आणणार?

त्यांची मानसिक शांतता कोण परत देणार?

परीक्षा रद्द करणे हा पेपरफुटीचा परिणाम आहे; पेपरफुटी होऊ न देणे ही व्यवस्थेची जबाबदारी आहे.

**प्रश्न फक्त आरोपींचा नाही; प्रश्न संपूर्ण व्यवस्थेचा आहे!**

प्रश्नपत्रिका कुठून फुटली?

कोणाकडे पोहोचली?

कोणी विकली?

कोणी विकत घेतली?

कोणत्या टप्प्यावर सुरक्षा भेदली गेली?

**आणि सर्वांत महत्त्वाचे...**

या संपूर्ण प्रक्रियेत आतून कोणाची साथ होती?

या प्रश्नांची उत्तरे केवळ चौकशीच्या कागदावर न राहता जनतेसमोर आली पाहिजेत.

कारण पेपरफुटी ही एखाद्या व्यक्तीची हुशारी नसून व्यवस्थेतील भेगांचा फायदा घेणारी भ्रष्ट मानसिकता आहे.

शिक्षणाचा उद्देशच आपण बदलला नाही का? इथेच खरा प्रश्न उपस्थित होतो.

आपण शिक्षणाला ज्ञान, विचार, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन मानतो की केवळ नोकरी मिळविण्यासाठीची प्रमाणपत्रे आणि गुणांची शर्यत बनवतो? परीक्षा म्हणजे विद्यार्थ्याच्या ज्ञानाची तपासणी असायला हवी; पण ती जर आयुष्य-मरणाचा प्रश्न बनली, तर तिथे गैरमार्ग शोधणारी मानसिकता जन्माला येते.

गुण मिळवणे महत्त्वाचे ठरते.

रँक मिळवणे महत्त्वाचे ठरते.

सरकारी नोकरी मिळवणे हेच अंतिम ध्येय ठरते.

आणि मग 'कसेही करून यश मिळवायचे' ही मानसिकता रुजते.

याच मानसिकतेला खतपाणी घालणारी स्पर्धात्मक परीक्षा संस्कृती आपण तयार केली आहे.

म्हणूनच, ही मालिका आणि मानसिकता बदलायची तर प्रचलित शिक्षण व्यवस्थेतच मूलभूत परिवर्तन करणे आवश्यक आहे.

फक्त पेपरफुटी करणाऱ्यांना पकडून प्रश्न सुटणार नाही. पेपरफुटीची मानसिकता निर्माण करणारी व्यवस्था बदलावी लागेल.

**शिक्षणात परिवर्तन म्हणजे नेमके काय?**

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ एका तीन तासांच्या प्रश्नपत्रिकेवर अवलंबून राहता कामा नये.

ज्ञानासोबत कौशल्य, तर्कशक्ती, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि सामाजिक जाणीव यांचेही मूल्यमापन झाले पाहिजे.

स्पर्धा असावी; पण ती एकमेकांना संपविण्याची नव्हे, स्वतःला घडविण्याची असावी.

शिक्षणातून गुणांपेक्षा ज्ञानाला, प्रमाणपत्रांपेक्षा कौशल्याला आणि पाठांतरापेक्षा विचारशक्तीला महत्त्व मिळाले पाहिजे.

तेव्हाच शिक्षण व्यवस्था बदलणार आणि त्यासोबत तिच्याभोवती निर्माण झालेली गैरमार्गाची मानसिकताही बदलणार.

आता कठोर कारवाईसोबत मूलभूत सुधारणा हव्यात!

प्रत्येक पेपरफुटीनंतर दोषींवर कठोर कारवाई करू असे सांगून भागणार नाही.

व्यवस्थेची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.

प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून छपाई, पॅकिंग, वाहतूक आणि परीक्षा केंद्रापर्यंत प्रत्येक टप्प्यावर अभेद्य सुरक्षा व्यवस्था असली पाहिजे.

पेपरफुटी करणाऱ्याला कठोर शिक्षा झालीच पाहिजे; पण त्याचबरोबर निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.

कारण चोरी करणारा एकटा दोषी असतोच; पण चोरीची संधी निर्माण करणारी व्यवस्था निर्दोष असू शकत नाही.

तरुणांचा विश्वास तुटू देऊ नका!

आजचा विद्यार्थी फक्त नोकरी मागत नाही.

तो न्याय्य संधी मागतो.

तो एवढेच म्हणतो

माझ्या मेहनतीशी बेईमानी करू नका!

त्याला पैशाने प्रश्नपत्रिका विकत घेणारा प्रतिस्पर्धी नको.

त्याला राजकीय ओळखीवर संधी मिळवणारा प्रतिस्पर्धी नको. त्याला व्यवस्थेतील भ्रष्ट मार्गाने पुढे जाणारा प्रतिस्पर्धी नको. त्याला फक्त एकच गोष्ट हवी आहे. स्वच्छ, पारदर्शक आणि समान संधीची परीक्षा!

**कारण प्रश्नपत्रिका फुटते तेव्हा फक्त पेपर फुटत नाही...**

विश्वास फुटतो.

व्यवस्थेवरील विश्वास फुटतो.

शिक्षणावरील विश्वास फुटतो.

मेहनतीवरील विश्वास फुटतो.

आणि सर्वांत धोकादायक म्हणजे

तरुणांच्या भवितव्यावरील विश्वास फुटतो.

म्हणून आता केवळ पेपरफुटी रोखण्याची नव्हे, तर पेपरफुटीला जन्म देणारी मानसिकता आणि व्यवस्था बदलण्याची वेळ आली आहे.

परीक्षा व्यवस्था पारदर्शक करा!

शिक्षण व्यवस्था परिवर्तनशील करा!

मेहनतीला न्याय द्या!

आणि तरुणांचा विश्वास परत मिळवा!

कारण,

परीक्षा पेपरफुटी... झालीया डोकेदुखी!

पण ही डोकेदुखी फक्त विद्यार्थ्यांची नाही...

**ही संपूर्ण शिक्षणव्यवस्थेला आत्मपरीक्षण करण्याची वेळ आहे!**

**पत्रकार विकास दळवी**
**दै. अक्षराज,ठाणे प्रतिनिधी**

## जन्माष्टमी

रे संभवामि युगे युगे
देतो विस्मय दाखला
सुखदायी जन्माष्टमी
दिधला शब्द राखला

मध्य रात्री काळरात्री
सूर्य प्रकाश फाकला
काळ पण सुखावला
अबीरगुलालेमाखला

कारागृहाच्या भिंतीने
गोपाळकालाचाखला
स्पर्श होता ममत्वाचा
गळूनपडल्या शृंखला

दार खुलले बंदिगृहाचे
काळही क्षणी रूकला
विश्वरक्षक ये जन्माला
सुरक्षारक्षक रे झुकला

दिशासज्ज स्वागताला
डोह यमुनेचा उसळला
दुग्ध जणू वाहे स्तनात
स्नेहमहापूर फेसाळला

पादस्पर्शे शांत उमाळा
प्रवाह तीव्र उच्छृंखला
वाटदिधली वसुदेवाला
वैभवप्राप्त हो चिखला

धन्य धन्य कान्हा जन्म
अगम्यलिला जगताला
जगण्याचे सार्थ सादर
अर्थ उमगला भूमितला

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# धार्मिकतेचे 'बाजारीकरण'

गणेशोत्सव तोंडावर आला आहे, गोपाळकाला, दहिहंडी ऊत्सवाच्या तयारीला गोविंदा पथके, गोविंदा लागले आहे, सराव सुरू झाले आहे, राज्यात सगळीकडे ऊत्साहाचे वातावरण असतांना सोमवारी मात्र दहिसर येथे दुर्दैवी घटना घडली, सरावा दरम्यान सहाव्या थरावरून पडुन एका बालगोविंदाचा दुर्दैवी मृत्यू झाला.

यावेळी सुरक्षेची काळजी घेतली नसल्याचे समोर आले आहे आणि मंडळाच्या अध्यक्षांवर गुन्हा दाखल झाला आहे. दरवर्षी दहीहंडी उत्सव आला कि थरावर थर रचण्याची जिवघेणी स्पर्धा सुरू होते. दरवर्षी होणाऱ्या दुर्घटना, जाणारे निष्पाप बळी यांची गंभीर दखल घेत न्यायालयाने बंधने घालून दिली आहेत मात्र त्याचे गांभीर्याने पालन करण्याऐवजी आमच्याच सणांवर बंदी का? दहीहंडी विटीदांडू ने फोडायची का असे नाहक दावे केले जातात. दहिहंडी ला साहसी खेळाचा दर्जा, खेळाडूंना विमा संरक्षण या सर्व गोष्टी स्वागतार्ह आहे मात्र एखादी दुर्घटना घडली तर त्या व्यक्तीचे आणि कुटुंबियांचे आयूष बरबाद होते ते कायमचेच, आज अनेक पिडित विकलांग आयुष्य जगत आहेत, त्या विरूद्ध अनेक महिला आणि संघटना घडत आहेत. वेळ परत परत येत नाही, कि जीवन परत परत मिळत नाही.

ठाण्यात दहिहंडी वरून राजकारण रंगले. सणवारांना आलेले बाजारीकरणाचे स्वरूप, होणारी करोडो रुपयांची आर्थिक उलाढाल यामुळे धार्मिक सणांचे पावित्र्य नष्ट झाले आहे आणि ते दुसरे तिसरे कुणी नाही तर आपणच नष्ट केले आहे.धार्मिक सण उत्सवांचे राजकियीकरण झाले आहे. घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे.

दरवर्षी दहीहंडी उत्सव आला कि थरावर थर रचण्याची जिवघेणी स्पर्धा सुरू होते, त्यातूनही धार्मिक सणवार यांचे पावित्र्य जवळपास नष्टच झाले आहे आणि काळ वेळ प्रसंग, धार्मिक पावित्र्य यांना तिलांजली देत केवळ ऊन्माद, धांगडधिंगा, बेफामपणा या सदरात मोडणारे ऊत्सव साजरे करण्याची प्रथा गेल्या काही वर्षांत सुरू झाली आहे.

लाखो करोडो रुपये खर्च करून नट-नट्या सेलेब्रिटी नाचवले जातात यात धार्मिकतेचा कुठेही लवलेश नसतो कि भाव नसतो. सगळा पैसा फेको तमाशा देखो असा काहीसा प्रकार सुरू आहे. थरांच्या बाबत दरवर्षी होणाऱ्या दुर्घटना, जाणारे निष्पाप बळी यांची गंभीर दखल घेत न्यायालयाने बंधने घालून दिली आहेत मात्र त्याचे गांभीर्याने पालन करण्याऐवजी आमच्याच सणांवर बंदी का? दहीहंडी विटीदांडू ने फोडायची का असे नाहक दावे केले जातात. मात्र अशा नाहक साहसी खेळात आपल्याच धर्माचे जीव जातात जखमी होतात. दहिहंडी ला साहसी खेळाचा दर्जा, खेळाडूंना विमा संरक्षण या सर्व गोष्टी स्वागतार्ह आहे मात्र एखादी दुर्घटना घडली तर त्या व्यक्तीचे आणि कुटुंबियांचे आयूष बरबाद होते ते कायमचेच, आज अनेक पिडित विकलांग आयुष्य जगत आहेत, त्या विरूद्ध अनेक महिला आणि संघटना लढत आहेत. वेळ परत परत येत नाही, कि जीवन परत परत मिळत नाही. आज दहिहंडी ऊत्सव म्हटला कि प्रसंगाला विपरीत नाचगाण्यांचा बिभत्सक नाच, त्यावर बेफाम होउन नाचणारी तरुणाई, त्यातुन आपापसात होणारी स्पर्धा, हे सगळ पवित्र सणांना गालबोट लावते. विशेष म्हणजे हे सगळं सगळे भव्यदिव्य ऊत्सव साजरे होत असताना करोडो रुपयांचा चुराडा होतो एवढा पैसा खर्च करणाऱ्यांकडे येतो कुठुन? आजकाल तर स्वेच्छेने मिळणाऱ्या वर्गणीची जागा जबरदस्तीच्या खंडणीत झाले आहे हे वास्तव आहे. अशाच ऊत्सवात एखाद्या राजकीय नेता भर सभेत तरूणाला ऊद्देशुन तूला कुठली मुलगी आवडली तर सांग तीला पळवून नेऊन लग्न लावून देईन असे सार्वजनिक रित्या सांगतो हे दहिहंडी सारख्या ऊत्सवात अपेक्षित आहे का ? याचा कोणी विचार करायचा.? आपणच आपल्या सणवारांचे पावित्र्य राखायचे नाही आणि संस्कृती जपायची नाही, धर्म जपायचा नाही आणि दुसऱ्यांना दोष देत देण्यात काय अर्थ आहे. जे प्रशिक्षित गोविंदा, मंडळे आहेत ते सर्व प्रकाराची काळजी घेऊन दहिहंडी ऊत्सव साजरा करतात त्याचा आनंद घेतला जावा.

आज राज्याची, राज्यातील आर्थिक परिस्थिती, जनतेची आर्थिक विवंचना बघता, राज्यापुढे गंभीर आव्हाने आहेत अशावेळी करोडो रुपयांच्या बक्षिसांची, खर्चाची स्पर्धा याला मुरड घालून तोच पैसा जनतेच्या गरजांवर खर्च केला जावा, तीच आजची खरी गरज आहे. राज्याचे गंभीर प्रश्न बाजूला ठेवून प्रत्येक चॅनलवर दिवसाचे चोवीस तास ऊत्सवाचे प्रक्षेपण गरजेचे आहे का? सणवारांना आलेले बाजारीकरणाचे स्वरूप, होणारी करोडो रुपयांची आर्थिक उलाढाल यामुळे धार्मिक सणांचे पावित्र्य नष्ट झाले आहे आणि ते दुसरे तिसरे कुणी नाही तर आपणच नष्ट करत आहे का?. डीजे चा ढणढणाट आता कुणालाही नको आहे यासाठी आता पुणेकर पुढे सरसावले आहेत इतर ठिकाणी देखील ने' डीजे'यासाठी जनजागृती होत आहे हे स्वागतार्हच आहे,शेवटी धार्मिक सण उत्सव साजरे करतांना धार्मिकता, पावित्र्य राखले गेलेच पाहिजे. शेवटी धार्मिक सण उत्सव साजरे करतांना धार्मिकता, पावित्र्य राखले गेलेच पाहिजे,सामाजिक स्वास्थ्य बिघडवून अशा पद्धतीचे धार्मिक सण, उत्सव हे कोणालाही मान्य नाहीत.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## एका छोट्याशा पिंपरे बु.गावात, कचऱ्यातून उगवलेली आशेची पालवी...



एका छोट्याशा पिंपरे बु.गावात एक ८० वर्षीय गरीब शेतकरी आजोबा आपल्या साध्याशा घरात एकटेच आयुष्य जगत आहेत. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असून त्यांना विशेष असा आधार नाही. मात्र, त्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि जगण्याची उमेद आजही कायम आहे.

नो हाऊ फॉउंडेशन आणि यूमिकोर इनोरा कंपनी यांच्या माध्यमातून कंपोस्टर प्लांटर उपक्रमाअंतर्गत त्यांना एक कंपोस्टर प्लांटर देण्यात आला. सुरुवातीला तो फक्त घरातील ओला कचरा व्यवस्थापन करण्यासाठी दिलेला एक साधा ड्रम होता; पण आजोबांनी त्याची अतिशय प्रेमाने आणि नियमितपणे निगा राखली. ते दररोज घरातील ओला घनकचरा कंपोस्टरमध्ये टाकतात, योग्य प्रकारे त्याचे व्यवस्थापन करतात आणि तयार होणाऱ्या खताचा वापर त्याच कंपोस्टर प्लांटरमधील भाजीपाला वाढवण्यासाठी करतात.

आज त्या कंपोस्टर प्लांटरमध्ये टोमॅटो, वांगी आणि मिरचीची हिरवीगार रोपे डोलताना दिसतात. कालपर्यंत ज्याला आपण कचरा समजत होतो, त्याच कचऱ्याचे आज सेंद्रिय खतामध्ये रूपांतर झाले आहे आणि त्यातून अन्नाची निर्मिती होत आहे.

आजोबांशी संवाद साधताना त्यांनी अत्यंत साध्या शब्दांत मनाला भिडणारी गोष्ट सांगितली. तुमचे आमच्यावर खूप उपकार झाले आहेत. या झाडांना वांगी, मिरच्या आणि टोमॅटो लागले, तर माझा आठवड्याचा बाजार भागेल.

त्यांचे हे शब्द ऐकताना या उपक्रमाचा खरा अर्थ जाणवला. हा केवळ कचरा व्यवस्थापनाचा उपक्रम नाही; तर तो गरजू कुटुंबासाठी बचत, स्वावलंबन आणि सन्मानाने जगण्याची एक छोटीशी संधी आहे.

एका कंपोस्टर प्लांटरमधून कचऱ्याचे खत झाले, खतामधून भाजीपाला उगवला आणि त्या भाजीपाल्यामधून एका आजोबांच्या जीवनात आशेची नवी पालवी फुटली.

हीच आपल्या घनकचरा व्यवस्थापन उपक्रमाची खरी यशोगाथा आहे.

**- सुहास महांगरे, खंडाळा**

## बळिराजा संकटात! दुष्काळ जाहीर करून तातडीने पंचनामे करा

### खासदार लंके यांची सरकारकडे आग्रही मागणी; पिके करपली, शेतकरी हवालदिल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** पावसाने दडी मारल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने दुष्काळ जाहीर करावा. तसेच पावसाअभावी करपून व जळून गेलेल्या पिकांचे त्वरित पंचनामे करून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

खा. लंके म्हणाले, जामखेड तालुक्यात शाळेच्या नवीन खोल्यांच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी गेलो असताना परिसरातील शेतशिवारातील पिकांची स्थिती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. यावेळी अनेक ठिकाणी पावसाअभावी पिके करपून गेल्याचे अत्यंत गंभीर चित्र दिसून आले. शेतकऱ्यांनी मोठ्या



अपेक्षेने पेरणी करून बियाणे, खते, मशागत व इतर शेतीकामांवर मोठा खर्च केला आहे. मात्र, अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले आहे.

पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करून करपलेल्या पिकांचे पंचनामे करण्यात यावेत. मात्र, केवळ पंचनामे करून कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात काहीही अर्थ नाही. पंचनामे झाल्यानंतर प्रत्यक्ष संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळाली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका खासदार लंके यांनी मांडली.

आज शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. शेतीवरील मोठा खर्च करूनही पिके हातातून जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. त्यामुळे शासनाने विलंब न करता यावा वास्तव परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा द्यावा, असे खासदार लंके यांनी सांगितले.

शासनाने परिस्थिती अधिक गंभीर होण्याची वाट न पाहता तातडीने निर्णय घ्यावा, दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून पिकांच्या नुकसानीचे पंचनामे जलदगतीने पुर्ण करावेत आणि पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व आवश्यक आर्थिक मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केली आहे. पावसाअभावी संकटात सापडलेल्या बळीराजाला केवळ आश्वासनांची नव्हे, तर तातडीच्या आणि प्रत्यक्ष मदतीची गरज असल्याचेही लंके यांनी स्पष्ट केले आहे.

#### जनावरांसाठी छावण्यांची व्यवस्था करा

दुष्काळी परिस्थितीचा परिणाम केवळ पिकांवरच नव्हे, तर पशुधनावरही होण्याची शक्यता आहे. पाण्याची टंचाई आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच शासनाने आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. जिल्ह्यात आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. जिल्ह्यात आवश्यक त्या ठिकाणी चारा डेपो सुरू करावेत तसेच जनावरांसाठी छावण्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणीही खासदार निलेश लंके यांनी केली आहे

## कामोठ्यात पारनेरकर रहिवासी संघाची ऐतिहासिक दहीहंडी

### ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची ऐतिहासिक दहीहंडी गाजणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** मुंबई, नवी मुंबई व रायगड जिल्ह्यात उद्योग-व्यवसायानिमित्त स्थायिक झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील बांधवांच्या पारनेरकर रहिवासी संघाच्यावतीने सालाबादप्रमाणे यंदाही ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

संत शिरोमणी तुकाराम महाराज मंदिर प्रांगण, कामोठे येथे हा दहीहंडी महोत्सव मोठ्या भक्तिभावात व जल्लोषात संपन्न होणार आहे.

कामोठे शहरात एकट्या पाच हजारांहून अधिक पारनेरकर कुटुंबांची लोकवस्ती असून, वर्षभर विविध सांस्कृतिक सोहळे संघाच्या वतीने साजरे केले जातात. हा दहीहंडी उत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून आपली माती आणि संस्कृतीचा वारसा जपणारा नावलौकिक सोहळा आहे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष भाऊशेठ पावडे यांनी दिली.

मुंबई व उपनगरातील नामांकित गोविंदा पथके चित्तथरारक थर लावून सलामी देणार असून, दहीहंडी फोडणाऱ्या पथकाला५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. सहभागी प्रत्येक गोविंदा पथकाला आकर्षक बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

या सोहळ्यात सुप्रसिद्ध गायिका अस्मिता पुणेकर यांचा सांस्कृतिक कार्यक्रम, महिला माता-भगिनींसाठी खास 'होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा', संगीत भजन स्पर्धा, दहीहंडी पूजन व मान्यवरांचा भव्य सन्मान सोहळा असे विविध कार्यक्रम होणार आहेत. या सोहळ्याला पारनेर तालुक्यासह नवी मुंबई, पनवेलमधील सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी कार्याध्यक्ष



कुंडलिकशेठ वाफारे, सचिव कृष्णाशेठ ढोमे, उपाध्यक्ष दिलीपशेठ घुले, सहसचिव संजयशेठ आहेर, महादेवशेठ पुंडे, धनंजयशेठ निमसे, शुभम वाफारे, जालिंदरशेठ खोसे, सबाजीशेठ जराड, गणेश गुंड, प्रशांत ठुबे, डॉ. सिताराम गुंड, माऊली तांबोळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

तरी सर्व मुंबईकर, पुणेकर व पारनेरकर बांधवांनी या सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पारनेरकर रहिवासी संघाने केले आहे.

## प्रा.अनिल कांबळे २५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**



**दि.०३, पुणे :** रावसाहेब पटवर्धन विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, साने गुरुजी स्मारक, पर्वती पायथा, पुणे येथे ३५ वर्षांच्या प्रदीर्घ, समर्पित आणि सेवाभावी शैक्षणिक सेवेनंतर अनिल लक्ष्मीबाई तात्याबा कांबळे हे नियत वयोमानानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त साने गुरुजी स्मारक येथील बॅ. नाथ पै सभागृहात सेवापूर्ती गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास राष्ट्र सेवा दल संचालित शिक्षण प्रशासक मंडळाचे कोषाध्यक्ष विनोद गोरे, मंडळाचे सचिव शिवाजी खांडेकर,पर्यवेक्षक जीवन इंगळे, प्राथमिक मुख्याध्यापिका मीना काटे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व हितचिंतक उपस्थित होते. कांबळे यांच्या पत्नी अनुजा कांबळे यांचीही यावेळी विशेष उपस्थिती होती.

कांबळे यांनी आपल्या ३५ वर्षांच्या सेवाकाळात अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबतच संस्कार, शिस्त आणि जीवनमूल्यांची शिकवण देत त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत.देश पातळीवर मोठं संघटन असणाऱ्या राष्ट्र सेवा दल संघटनेच्या कार्यक्रमांमध्ये कांबळे सरांचा मोठा सहभाग असतो. राष्ट्र सेवा दल शिबीर, कलापथकांमध्ये अनेक शिबीर प्रशिक्षक घडवण्याचे काम कांबळे सरांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कांबळे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक कारकिर्दीतील योगदानाचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. दीर्घकाळ सहवास लाभलेल्या सहकाऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाजेदा मुलाणी यांनी केले. समारंभानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. कांबळे यांच्या सेवापूर्तीचा हा सोहळा भावनिक वातावरणात पार पडला.

## दिव्यात अवाजवी वीज बिलांचा नागरिकांना झटका; टोरेंट पॉवर विरोधात जनआक्रोश आंदोलनाचा इशारा

### १० बाय १०च्या खोलीत राहणाऱ्या कुटुंबांना ३ ते ५ हजारांची बिले; आठ दिवसांत कारवाईची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३ दिवा, (ठाणे) :** दिवा शहरातील नागरिकांना मागील काही महिन्यांपासून टोरेंट पॉवर कंपनीकडून भरमसाठ आणि अवाजवी वीज बिले येत असल्याचा आरोप करत आगरी कोळी महिला मंडळ, दिवा यांनी कंपनी प्रशासनाकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. लहान घरांमध्ये राहणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबांनाही तब्बल ३ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत वीज बिले येत असल्याने नागरिक आर्थिक अडचणीत सापडल्याचे निवेदनात म्हटले आहे.

दिवा शहरातील अनेक कुटुंबे हातावर पोट घेऊन जीवन जगत असताना वाढीव वीज बिलांचा मोठा आर्थिक भार त्यांच्यावर पडत आहे.




विशेषतः निराधार विधवा महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच बेरोजगार तरुणांना या अवाजवी बिलांचा मोठा फटका बसत असल्याचा दावा मंडळाने केला आहे. वीज बिलांच्या समस्येमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी आणि असंतोष निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

वीज बिलांबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी प्रत्येक घरातील वीज मीटरची तात्काळ तपासणी करण्यात यावी, चुकीची अथवा अवाजवी बिले दुरुस्त करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच निराधार, विधवा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सवलत योजना लागू करावी आणि थकीत अथवा वाढीव बिलांची रक्कम भरण्यासाठी हप्त्यांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

निवेदनाद्वारे टोरेंट पॉवर प्रशासनाला आठ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत नागरिकांच्या वीज बिलांच्या समस्येवर ठोस कार्यवाही करून दिलासा न दिल्यास, आगरी कोळी महिला मंडळ, दिवा आणि समस्त दिवावासीयांच्या वतीने टोरेंट पॉवरविरोधात तीव्र जनआक्रोश आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी टोरेंट पॉवर प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## मनोज जरांगे यांच्या उपोषणास पाठिंबा, पालम शहर कडकडीत बंद




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पालम (परभणी) :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषण सुरू असून, त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी पालम येथील सकल मराठा समाजाच्या वतीने पालम शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला शहरातील व्यापारी बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बंदच्या पार्श्वभूमीवर पालम शहरातील विविध बाजारपेठा, दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने दिवसभर कडकडीत बंद ठेवण्यात आली. व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला. त्यामुळे नेहमी गजबजलेल्या पालम शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळाला.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला राज्यभरातून विविध ठिकाणी पाठिंबा व्यक्त केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून पालम येथे सकल मराठा समाजाच्या वतीने शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते.

दरम्यान, बंदच्या काळात शहरातील नागरिकांनीही सहकार्य केले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक आदित्य लोणीकर यांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## खापरखेडा पोलिसांची धडक कारवाई ; १ लाख २९ हजार रुपयांची अवैध दारू नष्ट

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३, नागपूर :** खापरखेडा पोलीस ठाणे व राज्य उत्पादन शुल्क विभागाने मंगळवार १ सप्टेंबर मंगळवारला संयुक्त कारवाई करत तब्बल १ लाख २९ हजार १६० रुपये किमतीची अवैध देशी-विदेशी दारू जमिनीत खड्डा करून नष्ट केली. सावनेर प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर ही कारवाई करण्यात आली.

खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०२२ ते २०२५ या कालावधीत अवैध देशी-विदेशी दारू विक्री व वाहतुकी विरोधात एकूण ४८ गुन्हे दाखल करण्यात आले होते. कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेल्या अवैध देशी विदेशी दारूची एकूण किंमत



१लाख २९ हजार १६० रुपये इतकी होती. जप्त केलेला मुद्देमाल नष्ट करण्यासाठी न्यायालयाकडे परवानगी मागण्यात आली होती.

न्यायालयाच्या मंजुरीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, सावनेर-कळमेश्वर-३ चे उपनिरीक्षक यांना रितसर पत्रव्यवहार करून अवैध देशी विदेशी दारू नष्ट करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली. खापरखेडा पोलीस ठाण्याच्या मागील पटांगणात एक मोठा खड्डा खोदून पंच राजकुमार कानफाडे व दशरथ हिरेखन यांच्या समक्ष ही सर्व देशी-विदेशी दारू ओतून नष्ट करण्यात आली.

या कारवाई प्रसंगी खापरखेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे (सावनेर-कळमेश्वर-३) उपनिरीक्षक योगेश यलसतवाड, महिला पोलीस अंमलदार व मालखाना अंमलदार स्मिता पाल, मंगेश लांजेवार यांच्यासह पोलीस ठाण्याचे इतर कर्मचारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिंतूरमध्ये सील केलेला स्टोन क्रशर पुन्हा चर्चेत

## सील तोडून माल हलविल्याचा आरोप महसूल प्रशासनाच्या कारवाईवर गंभीर प्रश्नचिन्ह; पंचनामा व कागदपत्रे देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप

**अक्षराज : राहीम कोक्कर**

**दि.०३, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील मौजे भांबरी शिवारातील I-9 Freeways Private Limited Stone Crusher प्रकरण सध्या चांगलेच चर्चेत आले असून, महसूल प्रशासनाने कारवाई करून सील केलेल्या स्टोन क्रशरचे सील दुसऱ्याच दिवशी तोडून तेथील माल व साहित्य हलविण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. महसूल विभागाने एका बाजूला कारवाई करून संबंधित ठिकाण सील केले असताना, त्यानंतर तेथे पुन्हा हालचाली सुरू झाल्याच्या आरोपामुळे प्रशासनाच्या कारवाईची अंमलबजावणी आणि देखरेख याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित स्टोन क्रशरवर महसूल प्रशासनाच्या पथकाने कारवाई केली होती. नायब तहसीलदार दिलीप केरबा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत चारठाणा मंडळ अधिकारी कविता खाजगे, जिंतूर मंडळ अधिकारी मोहसीन पठाण, रायखेडा तलाठी धुडे, सावरगाव भीमा तलाठी वाकळे तसेच चारठाणा तलाठी प्रवीण बूरुकुल यांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे. कारवाईदरम्यान संबंधित स्टोन क्रशरला सील लावण्यात आले. मात्र सील लावल्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी संबंधित ठिकाणी हालचाली सुरू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. सील तोडून क्रशरमधील माल बाहेर काढण्यात येत असल्याचा आरोप झाल्याने, प्रशासनाने लावलेले सील नेमके कोणाच्या परवानगीने काढण्यात आले? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

### सील लावले मग माल बाहेर कसा?

महसूल प्रशासनाने एखाद्या ठिकाणी कारवाई करून सील लावल्यानंतर त्या ठिकाणी प्रशासनाची परवानगी नसताना कोणालाही माल हलविता येतो का, हा महत्त्वाचा प्रश्न या निमित्ताने पुढे आला आहे. जर माल हलविण्यासाठी प्रशासनाची परवानगी देण्यात आली असेल, तर त्यासाठी लेखी आदेश देण्यात आला होता का? आदेश कोणी दिला? त्यामध्ये कोणत्या मालाची आणि किती प्रमाणात वाहतूक करण्यास परवानगी होती? याची माहिती प्रशासनाने स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.दुसरीकडे, जर कोणतीही लेखी परवानगी नसताना सील तोडण्यात आले असेल, तर प्रशासनाने संबंधितांविरुद्ध तत्काळ कायदेशीर कारवाई का केली नाही, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

### वरिष्ठांचा निर्णय आहे या उत्तराने वाढला संभ्रम



या प्रकरणाबाबत नायब तहसीलदार दिलीप केरबा गायकवाड यांच्याकडे विचारणा करण्यात आली असता आमच्या वरिष्ठांचा निर्णय आहे, त्यांना माहीत आहे, अशा स्वरूपाचे उत्तर मिळाल्याचा दावा करण्यात येत आहे. या उत्तरामुळेच आता प्रशासनातील नेमक्या कोणत्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पुढील हालचाली झाल्या, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. जर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आदेश असेल तर तो लेखी स्वरूपात आहे का? आणि असल्यास तो आदेश सार्वजनिक करण्यास प्रशासन तयार आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### तहसीलदार कार्यालयातील कारभारावर ही प्रश्नचिन्ह

दरम्यान, या प्रकरणाची अधिकृत माहिती जाणून घेण्यासाठी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र तहसीलदार दुपारी २ वाजल्यानंतर कार्यालयात उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले, तसेच प्रसारमाध्यमांचे फोन घेतले जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. गंभीर प्रशासकीय कारवाईशी संबंधित प्रकरण असताना जबाबदार अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ नये आणि अधिकृत माहिती मिळण्यात अडथळे निर्माण व्हावेत, यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

### पंचनामा हातात घेऊन कारकून कार्यालयातून बाहेर

या प्रकरणातील आणखी एक बाब चर्चेत आली आहे. संबंधित कारवाईचा पंचनामा व कागदपत्रे घेऊन गौण खनिज विभागाचा कारकून कार्यालयातून निघून गेल्याचे सांगण्यात येत आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी संबंधित कारवाईचा पंचनामा आणि कागदपत्रांची हार्ड कॉपी मागितली असता ती देण्यास नकार देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे कारवाईचा पंचनामा तयार असेल तर तो प्रसारमाध्यमांना देण्यास प्रशासनाची अडचण काय आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

### कारवाई कागदावर की प्रत्यक्षात?

गौण खनिज उत्खनन, स्टोन क्रशर आणि महसूल प्रशासनाची सील कारवाई या सर्व बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. प्रशासनाने केलेली कारवाई प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविली जात आहे की केवळ कागदोपत्री कारवाई करून प्रकरण थंडबस्त्यात टाकले जात आहे, याबाबत आता नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.एका बाजूला प्रशासनाकडून सील लावण्यात आले असल्याचे सांगितले जाते, तर दुसऱ्या बाजूला त्याच ठिकाणी सील तोडून माल हलविण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे सील लावल्यापासून ते माल हलविण्यापर्यंत नेमके काय घडले? याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

### प्रशासनाने स्पष्ट करावे

या प्रकरणात पुढील बाबींबाबत महसूल प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे

- सील लावण्याचा अधिकृत आदेश कोणता?- सील लावल्यानंतर त्याची देखरेख कोणत्या अधिकाऱ्याकडे होती?- सील काढण्याची अथवा तोडण्याची परवानगी कोणी दिली?- माल हलविण्यासाठी लेखी आदेश देण्यात आला होता का?- पंचनामा नेमका काय सांगतो?सील तोडल्याचा प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आला का? परवानगीशिवाय सील तोडले असल्यास संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली? वरिष्ठांचा निर्णय असल्याचे सांगितले जात असेल तर संबंधित वरिष्ठांचा लेखी आदेश कुठे आहेप्रसारमाध्यमांना पंचनामा व अधिकृत कागदपत्रांची प्रत देण्यास नकार का देण्यात आला?

### चौकशीची मागणी

या सर्व आरोपांची सत्यता तपासण्यासाठी तहसीलदारांनी तातडीने चौकशी करावी. सील लावण्यापासून ते त्यानंतर झालेल्या हालचालीपर्यंतचा संपूर्ण घटनाक्रम तपासून संबंधित सर्व नोंदी, पंचनामा, आदेश आणि परवानग्या तपासण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, या प्रकरणात संबंधित स्टोन क्रशर चालक किंवा कंपनीची अधिकृत बाजू तसेच तहसीलदार प्रशासनाचे स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नसून, त्यांची बाजू समोर आल्यानंतरच या आरोपांबाबतचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

सील केलेल्या स्टोन क्रशरचे सील खरोखरच कोणाच्या परवानगीने काढण्यात आले? माल हलविण्यामागे कोणाचा आदेश होता? आणि पंचनामा व कागदपत्रे प्रसारमाध्यमांपासून का लपविली जात आहेत? या प्रश्नांची उत्तरे आता जिंतूरकरांना प्रशासनाकडून अपेक्षित आहेत.

# दातिवली येथील मूळ जमीन मालकाच्या जमिनीवर अतिक्रमणाचा प्रयत्न

## किणी कुटुंबीय भयभीत - पोलिसांकडे कठोर कारवाईची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, दिवा (ठाणे) :** दातिवली, ता. जि. ठाणे - मौजे दातिवली, ता. जि. ठाणे येथील सर्वे क्र. १४५/५ आणि १४७/५ या मूळ जमीन मालक चंद्रकांत मारुती किणी व त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीतील जमीन खोटे व बनावट दस्तऐवजांच्या आधारे हडप करण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप किणी कुटुंबीयांनी केला आहे.

किणी कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २५/०८/२०२६ रोजी १) सुनिल गोविंद म्हात्रे, २) जनक म्हात्रे, ३) लक्ष्मण म्हात्रे, ४) राज प्रल्हाद म्हात्रे, ५) प्रेम प्रकाश म्हात्रे, ६) धीरज प्रकाश म्हात्रे व त्यांच्या इतर साथीदारांनी संगनमत करून सदर जमिनीवर जेसीबीच्या सहाय्याने झाडे तोडून बेकायदेशीर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी मूळ जमीन मालक किणी यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता, अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी त्यावेळी संबंधित इसमांना सदर जागेवर न जाण्याबाबत समज / मनाई केली होती, असा दावा किणी यांनी केला आहे.

पोलिसांच्या निर्देशानंतर ही पुन्हा दि. ०२/०९/२०२६ रोजी सदर इसमांनी किणी यांच्या जमिनीत बेकायदेशीरपणे घुसण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. किणी यांनी त्यांना अडवून व्हिडिओ शूटिंग सुरू करताच, त्यांना दमदाटी करून मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न टळला.

बनावट पावत्यांच्या आधारे हक्क सांगण्याचा प्रयत्न - किणी यांचा आरोप चंद्रकांत किणी यांचा आरोप आहे की, सदर जमीन गेल्या २५ वर्षांपासून पडीक असताना, त्यावर हक्क सांगण्यासाठी



बनावट शेतसारा पावत्या तयार करण्यात आल्या आहेत. या पावत्यांवर कोणतीही अधिकृत शिक्का किंवा महसूल अधिकाऱ्याची स्वाक्षरी नसून, त्या विभिन्न खात्याच्या जमिनीच्या नावाने तयार करण्यात आल्या आहेत.

या बनावट पावत्यांच्या आधारे कुळ कायदा कलम ७० व अन्य तरतुदींन्वये खोटा अर्ज दाखल करून जमिनीत अर्धा हिस्सा मागितला जात असल्याचे किणी यांनी सांगितले. याबाबत त्यांनी पोलिसांकडे व महसूल विभागाकडे लेखी तक्रार दिली आहे, मात्र अद्याप कोणताही गुन्हा दाखल न झाल्याने भू-माफियांना कायद्याचे भय उरले नसल्याची भावना केणी कुटुंबीयांनी व्यक्त केली.

वारंवार धमकावले जात असल्याने आपल्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण झाला असून, आपल्या मालकीच्या जमिनीचे संरक्षण करावे, अशी मागणी चंद्रकांत मारुती किणी यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे केली आहे.

या प्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जमीन मालक यांचे सोबत प्रत्यक्ष भेट घेऊन भूमी कन्या व भूमी पुत्र सामाजिक सेवा संस्था अध्यक्ष वंदना गौरी उपस्थित राहून त्यांनी तक्रार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी सुरू करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिले.

# दिव्यात ठाणे महापालिकेची धडक कारवाई



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, दिवा (ठाणे ) :** दिवा सर्कल ते रेल्वे स्टेशन पर्यंत रस्त्याच्या मधोमध बसून गाळे टाकून व्यवसाय करणाऱ्या अनधिकृत फेरीवाले आणि दुकानदारांवर आज ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीने मोठी कारवाई केली. तसेच दिवा वाईन शॉप जवळ असलेल्या ढाब्यांवर सुद्धा कारवाई करण्यात आली. वाईन शॉपमधून दारू विकत घेऊन अनेक मद्यपी त्याच ढाब्यांवर बसून मद्यपान करत होते. त्यामुळे तेथून ये-जा करणाऱ्या महिला, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. परिसरात अस्वच्छताही मोठ्या प्रमाणात वाढली होती.

या संदर्भात अनेक नागरिकांनी थेट ठाणे महापालिका आयुक्तांकडे तक्रार केली होती. त्याची दखल घेत आज ही कारवाई करण्यात आली.

अचानक झालेल्या या कारवाईमुळे भाजीवाले, मटण विक्रेते, कपडे विक्रेते, ढाबेवाले, खेळणी विक्रेते, भांडी विक्रेते, मोबाईल पार्ट विक्रेते यांची एकच धावपळ उडाली. प्रत्येक जण आपले सामान वाचवण्यासाठी प्रयत्न करत होता, मात्र कारवाई दरम्यान कोणतीही दयामाया दाखवण्यात आली नाही. दरम्यान, उद्या दिवा नगरीत ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव पाहणी दौऱ्यावर येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. सोशल मीडियावर दिव्याच्या परिस्थितीबाबत अनेक व्हिडिओ व्हायरल होत असल्याने, प्रत्यक्ष परिस्थिती पाहण्यासाठी आयुक्त उद्या सकाळी ११ वाजता शीलफाटा मार्गे दिव्याकडे येणार आहेत.

## थोडक्यात बातम्या

# सुहास महांगरेंची राजधानी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य खंडाळा तालुका अध्यक्षपदी निवड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, सातारा :** राजधानी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य ची मीटिंग सातारा येथील हुतात्मा स्मारक सुभाषचंद्र बोस पुतळा जवळ शाहु स्टेडियम सातारा येथे आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये संघटना वाढीसाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच आपली संघटना ही ११ तालुक्यात काम करीत असून उर्वरित महाराष्ट्र राज्य मध्ये संघटनेचे काम वाढवण्याचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जीवन मोहिते यांनी सांगितले. तसेच सुहास महांगरे हे गेली ३ ते ४ वर्षे ते दैनिक अक्षराज मध्ये खंडाळा तालुका प्रतिनिधी म्हणून काम पाहत आहेत. त्यांनी यापूर्वी खंडाळा तालुका उपाध्यक्ष सातारा जिल्हा सचिव म्हणून संघटनेचे काम पाहिले. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना संघटनेने खंडाळा तालुका अध्यक्षपदी म्हणून बिनविरोध निवड केली. राजधानी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. जीवन मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली. सदर निवडीला महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्ष जगताप महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष जीवन पाटील सचिव महाराष्ट्र राज्य चेतन भोसले तसेच सातारा सांगली सोलापूर पुणे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या तसेच खंडाळा तालुका अध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली म्हणून संघटनेचे आभार मानताना सुहास महांगरे यांनी सांगितले की, मी संघटना वाढीसाठी जास्तीत जास्त प्रयत्न करीन तसेच काम करण्याची संधी दिल्याबद्दल सर्वांचे खूप खूप आभार मानले.

# दिवा प्रभाग समितीत अधिकारी 'गायब' - बायोमेट्रिक हजेरीची मागणी

## माजी नगरसेवक हिरा पाटील यांचे सहाय्यक आयुक्तांना निवेदन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, दिवा (ठाणे) :** दिवा प्रभाग समिती कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अनियमित उपस्थितीमुळे नागरिकांना आपल्या कामांसाठी वारंवार कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत आहेत. सार्वजनिक बांधकाम, अतिक्रमण यासह विविध विभागांतील अधिकारी वेळेवर कार्यालयात उपलब्ध नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. या पार्श्वभूमीवर दिवा प्रभाग समिती कार्यालयात बायोमेट्रिक हजेरी प्रणाली तात्काळ सुरू करावी, अशी मागणी माजी नगरसेवक हिरा सिताराम पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात पाटील यांनी १ सप्टेंबर रोजी दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांना लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, अधिकारी कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत नागरिकांकडून विचारणा केली असता, नगर अभियंत्यांनी बोलावले आहे, अतिरिक्त आयुक्तांनी किंवा आयुक्तांनी बोलावले आहे अशी कारणे सांगितली जातात. त्यामुळे नागरिकांची कामे प्रलंबित राहतात आणि त्यांना पुन्हा पुन्हा कार्यालयात यावे लागते.

शासकीय कार्यालयीन शिस्तीनुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निर्धारित वेळेत कार्यालयात उपस्थित राहणे अपेक्षित आहे. तसेच कार्यालयीन कामानिमित्त बाहेर जाताना हालचाल नोंदवहीत (चेंीशाशपीं ठशसळीींशअ) आवश्यक नोंद करणे गरजेचे आहे. मात्र, या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असेही पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे.

बायोमेट्रिक प्रणाली कार्यान्वित झाल्यास अधिकारी-कर्मचाऱ्यांची कार्यालयात येण्याची व जाण्याची अचूक खछ-जणढ वेळ अधिकृतरीत्या नोंदवली जाईल. त्यामुळे उशिरा येणे, लवकर जाणे तसेच अनधिकृत अनुपस्थितीवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करता येईल.

बायोमेट्रिक हजेरीमुळे कार्यालयीन शिस्त निर्माण होण्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेत होण्यास मदत होईल. नियम असतील तर त्यांची काटेकोर अंमलबजावणीही झाली पाहिजे, अशी भूमिका हिरा पाटील यांनी मांडली आहे. दिवा प्रभाग समितीत बायोमेट्रिक हजेरी तात्काळ सुरू करून उपस्थितीची पारदर्शक नोंद ठेवावी आणि गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# मराठा आरक्षणाच्या मागणीसाठीबोरी शहर कडकडीत बंद

**अक्षराज : जफर शेख**

**दि.०३, बोरी (परभणी) :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचा उपोषणास पाठिंबा देण्यासाठी गुरुवार, दिनांक ०३ सप्टेंबर रोजी बोरी शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. परभणी आणि जिंतूर शहर बंदमध्ये सहभागी झाल्यानंतर बोरी शहरानेही उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली एकजूट दाखवून दिली.

बोरी शहरातील मुख्य बाजारपेठेसह विविध व्यापारी प्रतिष्ठाने व दुकाने बंद ठेवण्यात आली. सकाळपासूनच शहरातील वातावरण आंदोलनमय झाले होते. मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी 'एक मराठा, लाख मराठा', 'मनोज जरांगे पाटील आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला सरकारने गांभीर्याने घेत ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली. 'सरकार जागे व्हा, अन्यथा यापेक्षाही मोठे आंदोलन छेडण्यात येईल,' असा स्पष्ट इशारा मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला.दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या पुढील आदेशानुसार आंदोलनाची दिशा ठरवण्यात येईल. गरज पडल्यास जरांगे पाटील यांच्या इशाऱ्यावर मुंबईकडे कूच करून आंदोलनात सहभागी होण्याचा निर्धार यावेळी मराठा समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

बोरी शहर बंदला व्यापारी, युवक तसेच मराठा समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने शहरातील नेहमीची वर्दळ कमी झाल्याचे चित्र दिसून आले. आंदोलनादरम्यान शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासन व पोलिसांकडून आवश्यक खबरदारी घेण्यात आली.परभणी आणि जिंतूर शहरासोबतच बोरी शहरानेही कडकडीत बंद पाळत मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला. बोरीतील या बंदमुळे मराठा समाजाच्या आंदोलनाला स्थानिक पातळीवर मिळत असलेला वाढता पाठिंबा पुन्हा एकदा अधोरेखित झाला. आता सरकार मराठा समाजाच्या मागण्यांबाबत कोणता निर्णय घेते, याकडे बोरीसह संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.